ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# खादी - एक जीवन सिध्दांत

*** Dr. Radhika Parasnis Gupte**

** के.ग.जोशी कला आणि ना.गो.बेडेकर वाणिज्य, महाविद्यालय स्वायत्त, ठाणे*

**खादी** हा शब्द आपणास महात्मा गांधी यांची आठवण करून देतो. भारतात खादीचे महत्त्व खूप आहे. खादी कापड हा भारतीय पोशाखास दिलेला सन्मान आहे अंगावर कापड परिधान करावे व त्या कापडाची विविध वस्त्रे आणि पोषख बनवणे हे आपल्या भारतीय लोकांची एक सकारात्मक मानसिकता आहे. या मानसिकतेमध्ये खादी कापड यास खरोखर मानाचा मुजरा आहे. खादी हा एक कापडाचा प्रकार असल्याने स्वदेशी कापडामध्ये खादीचा सन्मान केला जातो. खादी कापड हे लोकप्रिय कापड आहे अंगावर ते परिधान केल्यावर त्याचे दिसणे खानदानी श्रीमंती प्रशस्त वाटते.

वंदनीय राष्ट्र संत तुकडोजी महाराज तुकड्या दास यांनी ग्रामगीतेतील 16 व्या अध्यायात "वेशास" वैभव असे संबोधले आहे. कपड्यातील किती कपडे परिधान केले तरी खादी परिधानात काही वेगळीच ऐट असते. इतर संत तुकडोजी महाराजांनी पोषाखास निषेध केले आहे खादीचे कापड संपूर्णपणे हाताने तयार केलेले असते खादीचे कापड बनवण्याची पद्धत ही खूप जुनी आहे आपल्या भारतीय उपखंडात 5000 वर्षापासून ही पद्धत प्रचलित आहे महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात खादी चरखा जनतेच्या मनात रुजवले खादी च्या संदर्भात महात्मा गांधी यांचा दृष्टिकोन समाजाला एक सकारात्मक स्वावलंबी व अहिंसक साधनेच्या माध्यमातून मूल्यवान मार्ग सांगितला.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

भारतात खादी उद्योग सुरू झाले. या खादी उद्योगाची माहिती भारतीय विश्वकोशात सविस्तर दिली आहे. हाताने कातलेल्या सुतापासून हाच मागावर विणलेल्या सुती लोकरी व रेशमी कापडाला "खादी" असे म्हणतात. सुतापासून कापड विणणे हा धंदा भारतात अनेक शतकापासून चालत आहे. आपल्या भारतात कापूस वेचणे व नंतर ते कापसाचे सूत विणणे हा प्रवास खरच खूप खडतर आहे. आपल्या भारतात कारागीर हे कौशल्य पूर्णतेने काम करतात या कापडाने तलमपणा असतो कापडाचा पोतही नाजूक छान असतो. खादीला खद्दर असे म्हणतात. खद्दर म्हणजे जाडे, भरडे कापड. खादीचा उल्लेख चार वेदात पण आला आहे. सम्राट अशोकांनी खादीला महत्व दिले.

'वर्दी में चरखा" हे ब्रम्हर्षी पंडित सातवेळकर यांचे पुस्तक इ.स. 1922 मध्ये प्रकाशित झाले त्यात खादी चे सविस्तर विवरण आले आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

खादी हे हाताने कातलेले आणि स्टिच केलेले नैसर्गिक फायबरचे कापड आहे जे महात्मा गांधींनी 1918 मध्ये भारतीय उपखंडाच्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान तयार केले होते, 'खादी" हा शब्द भारत, पाकिस्तान आणि बांगलादेशात सर्वत्र वापरला जात होता. हाताने विणलेल्या कापडाचा पहिला तुकडा अहमदाबादच्या साबरमती आश्रमात 1917-18 मध्ये तयार झाला. कापडाच्या क्रूरपणामुळे गांधींना खादी म्हणू लागले. कापड हे सहसा हाताने कातलेले आणि सुती कापडाचे विणलेले असते. तथापि, त्यात रेशीम किंवा लोकर देखील असू शकतात, जे सर्व चरखा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फिरत्या चाकावर सुतामध्ये फिरवले जातात .

खादी भवन, मंडळे, कमिशन, चळवळ, व विविध खादी रेशमी, खादी क्षेत्र, खादी संस्था, खादी उत्पादन, खादी उदयोग अशा विविध स्वरूपात खादीचा विस्तार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी यांनी खादीस प्राधान्य दिले इ.स. 1921 मध्ये महात्मा गांधींनी व काँग्रेस समितीने खादी उद्योगास प्रोत्साहन दिले 20 लाख चरख्यांचा वापर केला अनेक मजुरांना उद्योगप्राप्त झाले भारत सरकार संघ निर्माण झाला होता त्यांच्याकडे खादी संदर्भातील आर्थिक प्रश्न सोपविले व त्यांना मार्ग काढण्यास सांगितले 1925 ते 1935 हा कालावधी खादीच्या उद्योगासाठी महत्त्वपूर्ण ठरला खादीची विक्री मोठ्या प्रमाणात झाली सुधारित चरखा यामुळे मजुरातील वाढ झाली खादी उद्योग कमी प्रमाणात झाला

1935 ते 1950 हा खादीचा कालखंड खरेदी विक्री आयात निर्यात यातच खूपच घडामोडी घडवणाऱ्या होत्या. 1945 नंतर आईचा कार्यक्रमात खूप बदल झाले 1953 मध्ये अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग मंडळ या स्वायत्तक प्रशासकीय मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाने खादी आणि ग्रामोद्योगाच्या विकासाच्या कार्यक्रम ठरवून देण्यावर विशेष भर दिला व त्यांची कार्यवाही केली पारंपारिक पद्धतीचे खादीचे कार्यक्रम करण्यात यावे असे म्हटले.

स्वावलंबी उत्पादनावर सर्वांनी लक्ष केंद्रित केले. विणकर व कर्जदारांना उत्तेजन देण्यात आले. 1957 ला खादी व ग्रामोद्योग यांचे आयोजित रूपांतर करण्यात आले आयोगाच्या वतीने राज्य सरकारला निधी देण्यात आला 1957 मध्ये खादीत उद्योग भरभराट भरभराटीला आले.

1956 ते 1957 मध्ये 88 लाख कामगार खादी उद्योगात गुंतले 1969 ते 71 मध्ये सहा ते बारा ताऱ्यांचा नवीन संपूर्ण धातूचा चरखा वापरण्यात आला. शोभिवंत कापड अनेक प्रकारच्या देशात वापरण्यात आले. खादी उद्योगांसाठी तिसरे वर्ष 1966 ते 69 वार्षिक योजनेसाठी 256.2 कोटी मजूर मंजूर करण्यात आले खादीची प्रदर्शने प्रशिक्षित खादी वस्त्र तयार करणे विविध उपक्रम तयार करणे झाले. खादी ग्रामोद्योग भवने स्थापन झाली खादीच्या विविध विकास योजना आखण्यात आल्या खादी प्रचार प्रसाराच्या या चळवळी विकास आराखडा हा प्रेरणादायी व कौतुकास्पद होता.

खादी आणि ग्रामाद्योग आयोग (LKVIC) ही एक वैधानिक संस्था आहे. "खादी आणि ग्रामाद्योग आयोग" अधिनियम 1956 मध्ये त्याची स्थापना केली. मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. विविध कार्यक्रम 28 राज्यांमध्ये राबवले जातात.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**खादीचा उपयोग व त्या उद्योगातून विकास :**

विकासाचे चक्र म्हणजे देशाच्या विकासाची संपत्ती आहे. जागतिकरणात प्रत्येक मानवाची जीवनशैली बदलत आहे. या बदलणा-या जीवनशैलीत खान, पान, पोषाक, विचार यांना फक्त पाश्चात्य संस्कृतींचा वारसा जोडला जात आहे. भ्रमणध्वनीच्या विश्वात हरवलेला माणूस स्वतःला कसे शोधणार हा प्रश्न पडतो. या मानवाला पोषाख, संस्कृती याचे भान फक्त खादीच करून देतो, खादी हा जीवन जगण्याचा विचारच नाही तर ती विचारधारा आहे. "खादी" शब्दच आपणांस एक विचार देतो.

आपली भारतीय संस्कृती स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारीत आहे. खादी जीवन हे या तीन मुल्यांवर आपली संस्कृती, आदर्श जीवनशैली, स्वावलंबन, पोषाखाचा, मनाचा, शरीराचा, बुध्दीचा, कला निर्मितीचा खानदानी सुसंस्कृत जीवन विचार आपणांस जगण्याचा शिकवतो. जात, पात, धर्म लिंग भेद या पलिकडे नेणारा खादी प्रवास प्रत्येक मानवाचा जीवन सिध्दांत आहे.

खादीचा सन्मान महात्मा गांधीजीने आपल्या स्वतःच्या शब्दांत केला. 'ज्या हाताने खादीचे वस्त्र विणले जाते, हस्तनिर्मित वस्त्र म्हणजे राष्ट्रीय गौरव आहे. वस्त्र हे माणसाची मुलभूत पाच गरजांपैकी एक मुलभूत गरज आहे.

महात्मा गांधीजीने विदेशी कपडयावर बहिष्कार घातला खादीचा पुरस्कार केला. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

1. ग्रामीण शेतक-यांना हिंदुस्थानामधील सर्व जनतेत सामावून घ्यायचे होते.
2. लोकांच्यात जागृती निर्माण करून त्यांच्यात आत्मनिर्भयता निर्माण करायची होती.
3. खादी निर्माण करणा-या लोकांच्या श्रमाचा अर्थव्यवस्थेसाठी त्यांच्या आत्मनिर्भयतेसाठी उपयोग करायचा होता.
4. गावातील सर्व लोक एकमेकांशी जोडली गेली होती. ती परस्पर एकमेकांवर निर्भय होती.
5. गावातील, ग्रामीण भागातील शक्ती ही भारतातील शक्ती आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्था त्याचे स्थान खूप मोठे होते.
6. स्वदेशी, हस्तनिर्मित वस्त्र या उद्देशाबरोबरच अतिशय प्रभावशाली, सशक्त, व्यावहारिक सर्व कल्याणकारी, ग्रामकंद्रीत अर्थव्यवस्था म. गांधीनी करायची होती, त्या शक्तीवरच स्वराज स्थापना हा पण उद्देश होता.
7. महात्मा गांधी यांना सर्वकल्याणकारी अनुकूल, मुलभूत परिवर्तन क्रांतीचे माध्यम खादीच्या माध्यमातून बनवायचे होते.
8. उपनिषेदवादी सत्ता, विदेशी अधिपत्य पासून देश मुक्ति हा हेतु संघर्षपासून भिन्न करणे.
9. महान आणि अद्वितीय विविधता व वैशिष्टयपूर्ण राष्ट्रीय संस्कृति आणि वस्त्र परंपरेतून शक्तिशाली, पुनःनिर्माण भारत बनवणे.

खादीच्या संदर्भातील महात्मागांधीजीचे विचार हे म्हणजे फार मोठा अभ्यास व संशोधन आहे. त्यांचे विचार सर्वकालीक व प्रासंगिक असून राष्ट्राच्या संदर्भातील धोरणात्मक व्यावहारिक आहेत. खादी दर्शन, ग्रामीण अर्थव्यवस्था, भारतास स्वदेशी साधनांच्या माध्यमातून सामाजिक-

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

सांस्कृतिक मूल्याचा परस्पर संबंध व हा दर्शन विचार पूर्णतः स्वदेशाचा विचारास समृध्द करते.

खादी व ग्रामाद्योग व उद्योगाची संधी नवीन तरूणांना यातून प्राप्त होईल. आजची पिढी उच्च शिक्षण घेवून परदेशात जाते. पाश्चात्य जीवनशैली स्विकारत आहे.

प्रधान मंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम नवीन योजना कार्यान्वित करण्यात येतात. त्यांची माहिती घेवून तरूणांनी "खादी" हे करीयर निवडावे.

खादी म्हणजे स्वदेशी चळवळ आहे. अशी विचारधारा समाजात रूढ आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच भाषणात सांगतात की, "भेट देताना फुल न देता, खादीपासून बनविलेल्या वस्तु भेट द्याव्यात. महाराष्ट्र शासनाने देखील खादी उदयोगास प्रोत्साहन दिले आहे. स्वातंत्र्य संग्राम व खादीचे अतुट नाते आहे. त्यास व्यावसायिक व व्यापक स्वरूप आहे.

खादी ही नव्या पिढीला संस्कृतीचे भान करून देणारी व भारतीय संस्कृती जपणारा एक जिवन सिध्दांत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्रमोदी यांनी नव्या पिढीला खादीचा छान असा संदेश दिला आहे. "खादी देश के लिए, खादी फॅशन के लिए" खादी चिरंतन रूपात रहाणारी संस्कृती जपणारी व जगवणारी नित्यनुतन अशी बौध्दिक विचारधारा आहे. नव्या पिढीला खादी संस्कृती संस्कृतपणाकडे नेण्याचा एक राजमार्ग आहे.

**संदर्भ :**

1. *विश्वकोष*
2. *महात्मा गांधी व खादी*
3. *गुगल*
4. *कुरूक्षेत्र मासिक - डॉ. रविंद्र कुमार*
5. *माहिती स्त्रोत - महान्युज - डॉ. गणेश मुळे*
6. *भारतीय संस्कृती कोश खंड -9*

*Cite This Article:*

Dr. Gupte R.P. *(2025)*. *खादी - एक जीवन सिध्दांत* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number I, pp. 147–150).